World Wide Journal of Multidisciplinary Research and Development




WWJMRD 2020; 6(3): 50-51
www.wwjmrd.com
International Journal
Peer Reviewed Journal
Refereed Journal
Indexed Journal
Impact Factor MJIF: 4.25
E-ISSN: 2454-6615

***वळवी विश्वास गोरखनाथ,***
***संशोधक विद्यार्थी***
***सामाजिक शास्त्रे***
***प्रशाळा,इतिहास विभाग,***
***कबचौउमवि,जळगाव,***

**Correspondence:**
***वळवी विश्वास गोरखनाथ,***
***संशोधक विद्यार्थी***
***सामाजिक शास्त्रे***
***प्रशाळा,इतिहास विभाग,***
***कबचौउमवि,जळगाव,***

# ( विल्यम वॉर्ड :-एक आवेशपूर्ण मिशनरी )

***वळवी विश्वास गोरखनाथ,***

**प्रस्तावना:-**

भारतीय भूमीत अनेक मिशनऱ्यानी आपले पाय रोवले.त्यात विल्यम वॉर्ड यांचे कार्य महत्वपूर्ण आहे.विल्यम केरीचे ते सहकारी होते.मिशनरी चळवळीचा कर्ता सोबत आपले मिशनरी कार्य सुरु करणे हे विल्यम वॉर्डचे भाग्यच म्हणावे लागेल तरी त्यांनी आपल्या अभूतपूर्ण विचारांनी भारतीय धर्म आणि संस्कृती एक वेगळे स्थान प्राप्त केले. विल्यम वॉर्डने Account आणि History of the Hindoos या ग्रंथाच्या माध्यमातून हिंदूधर्मतत्वावर आपले सर्वोत्तम विचार मांडले.त्याचे हे कार्य भारतात जाणाऱ्या नवीन मिशनरींसाठी ज्ञानाचा खजिना होता.कारण इंग्लंडमध्ये आणि इतर युरोपियन ख्रिस्ती देशात अशी प्रथा होती कि ज्या देशात मिशनरी पाठवायचा असेल त्याअगोदर त्या मिशनरीला त्या देशातील धर्म,संस्कृती,आणि विचार जाणून आणि समजून घेणे फारच अगत्याचे होते. विल्यम वॉर्ड यांचे मिशनरी चळवळीतील योगदान आणि विचार हे जागतिक मिशनरी चळवळीवर परिणाम करणारे झाले.विल्यम केरी नंतर भारतीय धर्म आणि संस्कृतीवर सर्वोत्तम भाष्यमाला लिहिणारे ते सर्वोत्कृष्ट आणि प्रामणिक मिशनरी होते.

**विल्यम वॉर्ड याचे कार्य:-**

*"विल्यम वॉर्ड यांचा जन्म डर्बी येथे १७६९ साली झाला. *केरी* यांच्यापेक्षा आठ वर्षांनी लहान असणारे *विल्यम वॉर्ड हे चोवीस वर्ष त्यांचे सहकारी होते* .आणि त्यांच्यासाठी केरी यांची कारकीर्द स्तुत्य होती.वडिलांची मिस्त्री आणि पेट्या बनवण्याच्या व्यवसाय पुढे नेण्याऐवजी त्यांनी डर्बी मर्क्युरी या वृत्तपत्राच्या* मालकाकडे प्रशिक्षण घेतले काही काळाने त्यांनी या वृत्तपत्राचे संपादक म्हणून लंडन आणि हल या ठिकाणी गेले* .पत्रकार म्हणून काम करत असतांना आणि भारतात येण्यापूर्वी विल्यम जोन्स यांनी केलेल्या अनुवादाचा अभ्यास त्यांनी १७९० साली त्यांनी केला याशिवाय हॉलवेल यांचे रिलिजिअस टेनेटस ऑफ द जेंटूज आणि अलेक्झांडर डोव किंवा हॉलडेव याचे हिंदूवादावरील लेखन त्यांनी वाचले असावे.केरी यांची *१७९३ साली भेट झाल्यानंतर त्यांनी विल्यम वॉर्ड यांना श्रीरामपूर येथील बाप्टिस्ट मिशनबरोबर काम करण्याची गळ घातली."*१ विल्यम वॉर्ड यांच्या विचारपद्धतीवर चार महत्वाच्या विचारप्रवाहांच्या प्रभाव होता.विल्यम वॉर्ड यांच्या आशयाला उत्तरवासाहतीक काळाचा संदर्भ जोडून त्याचा औचित्यपूर्ण करणाऱ्या अलीकडच्या काळातील अभ्यासकांना दृष्टिकोन ग्राह्य मानण्यापेक्षा त्यांचे विचार समजून घेण्यासाठी हे विचारप्रवाह लक्षात घेणे गरजेचे आहे.

*' विल्यम वॉर्ड यांच्या धार्मिक धारणा आणि विचार यांचा पगडा साहजिकच प्रथमतः त्यांच्या इव्हेंजिकल चळवळीतील अनेक सहकार्यावर पडला.केरीप्रमाणे त्यांचे मूळ *आंगलिकन* असले तरी त्यांची आई *वेस्लीईन मेथोडिस्ट* शिकवणूकीप्रति अधिक आकर्षित झाली *.हल येथे काम करतांना वॉर्ड डिसेंटर्स आणि मेथोडिस्ट यांच्या सानिध्यात आले आणि २८ ऑगस्ट १७९६ या दिवशी पर्टीक्युलर बाप्टिस्ट चर्चमध्ये त्यांनी बाप्तिस्मा घेतला.या दरम्यान तुलनेने त्यांच्या विचारांमध्ये स्पष्टता होती.हे त्यांनी लिहिलेल्या पत्राच्या सारांशातून स्पष्ट होते.'मी कोणत्या तत्वाचे पालन करतो अशी विचारणा झाली तर मी त्वरित सांगेन:ईश्वर प्रेमस्वरूप आहे.येशूने पापडोहात बुडालेल्या तारण्यासाठी जन्म घेतला.त्याच्यावर विश्वास असणारे तारतील.मी माझ्या कामातून येशुप्रती असणारी श्रद्धा व्यक्त करेन."*२ भारतीय समाजजीवनात आपले संपूर्ण आयुष्य वेचणारा या मिशनरीच्या एक प्रसंग आहे ज्यात विल्यम केरी आणि विल्यम वॉर्ड यांच्यात संवाद होत असतो.विल्यम वॉर्ड म्हणतात *" बाप्टीस्ट सोसायटीचा नवान आपला अकाउंट चालतो..स्वत:च्या खात्यावर रक्कम काही नाही...न तुमच्या...ना माझ्या" विल्यम केरींनी प्रश्नार्थक नजरेने बघितले.वार्ड म्हणाले "आता आपण स्वयंपूर्ण आहोत.बाप्टीस्ट सोसायटी नया पैसा देत नाही अनेक वर्षे...पण सर्व प्रोफिट खर्च करून जी काही मालमत्ता उभी राहते.ती बाप्टीस्ट सोसायटीच्या नवान उभी राहते."३* विल्यम वॉर्ड असे मिशनरी होते ज्यांनी विल्यम केरीसोबत आपले सर्वस्व भारताचा कल्याणार्थ देऊन टाकेल.त्यांनी कधी विरोध केला नाही.आपल्या सहकारी सोबत ते जेवढे प्रामाणिक होते.तेवढेच ते स्वत:बद्दलहि होते. **विल्यम वॉर्ड* यांची**

**प्रसिद्ध ख्रिस्ती धर्मातत्वे/विचार:-**

१) अश्रद्ध माणसे आणखी पापाच्या गर्तेत सापडतील:- विल्यम वॉर्ड यांचे मत स्पष्ट होते श्रद्धा ठेवणारी माणसे हि तारली जातात.पण त्यांना काय म्हणायचे आहे.इथे नास्तिकतेचे वलय नाही.जे धार्मिकतेच्या नावावर समाजव्यवस्थेत

पाप आणि अंधश्रद्धा माजवितात ते म्हणजे अश्रद्ध लोक आणि अशा लोकांपासून भारतीय समाजाला वाचवून त्यांना ख्रिस्त देणे आहे.

२) निरीश्वरवादी व्यक्तींनी विश्वास ठेवण्यापूर्वी प्रथमतः येशूचा संदेश वाचावा आणि स्वतःला वाचवावे:- विल्यम वॉर्ड म्हणतात नास्तिक लोकांत विश्वास उपन्न होतो पण तो फक्त ख्रिस्तावर विश्वास ठेवल्याने झाला पाहिजे यासाठी प्रत्येक मिशनरींनी प्रयत्नशील असणे अगत्याचे आहे.

३) येशूचे रूप कळल्याशिवाय ईश्वराच्या स्वरूपाची प्रचिती येणार नाही:- ख्रिस्ताला जाणल्याशिवाय मनुष्य मनुष्य भवपार होणार नाही.येथील लोकांकडे अपार ज्ञान असूनही त्यांना साम्राज्य मिळू शकले नाही.स्वर्गप्राप्तीसाठी ते पात्र नाहीत.आणि त्यांना येशुच्या कृपेअभावी मुक्ती मिळवण्याची कोणतीही आशा नव्हती,म्हणून ते दुखी होते.

४) मी कोणत्या तत्वाचे पालन करावे अशी विचारणा झाली तर मी त्वरित सांगेन "ईश्वर प्रेमस्वरूप आहे.येशूने पापडोहात बुडालेल्यांना तारण्यासाठी जन्म घेतला.त्यांच्यावर विश्वास असणारे तरतील.आणि हाच विश्वास ते आपल्या मिशनरी कार्यातून भारताबद्धल पाहत होते.

५) मी माझ्या कामातून येशूप्रति असणारी श्रद्धा व्यक्त करेन.जर ईश्वर आपल्यांना भरभरून प्रेम देतो तर आपणही एकमेकांशी प्रेमाने वागायला हवे.अश्रद्ध व्यक्ती निंदनीय आहेत.पण श्रद्धा हि योग्य असावी आणि त्यासाठी मी पूर्णपणे प्रीतीचा अवलंब केलेला आहे.

**विल्यम वॉर्ड यांची ग्रंथसंपदा:-**

१) अकाउंट ऑफ द रायटिंग रिलिजिन अँड मॅनर्स ऑफ हिंदुज २) अ व्हु ऑफ द हिस्टरी ३) लिटरेचर अँड द रिलिजिन ऑफ द हिंदुज. ४) The Description and Use of a New Astronomical Instrument, for Taking Altitudes of the Sun and Stars at Sea, Without an Horizon; Together with an Easy and Sure Method of Observing the Eclipses of Jupiter's Satellites.५) A View of the History, Literature, and Religion of the Hindoos: Including a Minute Description of Their Manners and Customs, and Translations from Their Principal Works. ६)हिस्टरी अँड मायथॉलॉजी ऑफ द हिंदुज.

**निष्कर्ष:**

विल्यम वॉर्ड हे विल्यम केरी बरोबर मिशनरी चळवळीचे खंदे पुरस्कर्ते होते.विल्यम वॉर्ड यांनी आपल्या लिखाणाने आणि कार्याने आधुनिक भारताचा इतिहासात मौल्यवान योगदान दिले.हिंदूवादाची व्याख्या करणारे करणारे ते पहिले युरोपियन मिशनरी होते.जुलमी राज्यसत्ता आणि पोपचे वर्चस्व विल्यम वॉर्ड यांना अमान्य होते.कोणत्याच वैचारिक चौकटीत बांधील नसल्याने त्यांच्या स्वतःचाही प्रत्यक्ष प्रमाणावर विश्वास असल्याने त्यांच्या समीक्षेला कोणत्याही मर्यादा नव्हत्या.एक मिशनरी,लेखक,शब्दकर्ता,अनुवादक,एकोणिसाव्या शतकातील फक्त भारतातचं नाही तर युरोपमध्ये ज्यांच्या लेखनाला मान्यता मिळाली,हिंदूवादाचे सर्वोत्तम मांडणी करणारे, विल्यम वॉर्ड यांच्या कार्याला सलाम.

**संदर्भग्रंथसूची:-**


१) परिकल्पित हिंदुवाद,जेफ्री ए ऑडी.सेज पब्लिकेशन.प्रथमावृत्ती २०१९.न्यू दिल्ली.पृ क्र-१२६

२) परिकल्पित हिंदुवाद,जेफ्री ए ऑडी.सेज पब्लिकेशन.प्रथमावृत्ती २०१९.न्यू दिल्ली.पृ क्र-१२७-२८

३) असे होते विल्यम केरी.डॉ अरुण गद्रे.राजहंस प्रकाशन.पुणे .प्रथमावृत्ती.पृ क्र १३०.